# त्रिविक्रमाची १८ वचने (मराठी)

दत्तगुरुकृपे मी सर्वसमर्थ तत्पर । श्रद्धावानास देईन सदैव आधार ॥१॥

मी तुम्हांसी सहाय्य करीन निश्‍चित । मात्र माझे मार्ग त्रि-नाथांसीच ज्ञात ॥२॥

धरू नका जराही संशय याबाबत । न होऊ देईन तुमचा मी घात ॥३॥

प्रेमळ भक्ताचिया जीवनात । नाही मी पापे शोधीत बसत ॥४॥

माझिया एका दृष्टिपातात । भक्त होईल पापरहित ॥५॥

माझ्यावरी ज्याचा पूर्ण विश्‍वास । त्याच्या चुका दुरुस्त करीन खास ॥६॥

तैसेचि माझ्या भक्तां जो देई त्रास । सजा मी नक्कीच देईन त्यास ॥७॥

माझिया भक्तांचे कुठलेही प्रारब्ध । बदलीन, तोडीन वा घालीन बांध ॥८॥

न येऊ देता जगदंबेच्या नियमास बाध ।
दु:खातून काढूनी बाहेर, मार्ग दावीन अगाध ॥९॥

सदैव मी तुमचा उगवता देव । नाही मावळणार, सौम्य करीन दैव ॥ १० ॥

पूर्ण श्रद्धेने करा नवस, करा भक्ती गाळा घाम ।
पावेन तुमच्या श्रद्धेनुसार, मी सर्वकाळ सुखधाम ॥११॥

सर्व मार्गांमध्ये, मज असे भक्ती प्रिय ।
जन्म-जीवन-मृत्यू तुमचे काहीही न व्यर्थ जाय ॥१२॥

शरणागत होऊनी करी जो गजर । त्याचिया जीवनी सुख अपरंपार ॥१३॥

माझिया भक्तीपासून, कोण तुम्हांस रोखेल?
कामक्रोध जरी असले भरून, माझे नाम माझिया भक्तास तारेल ॥१४॥

प्रेमे जो माझे घेई नाम, त्याचे काम सर्व पुरवीन ।
संपन्न करीन त्याचे धाम, भरीन शांती समाधान ॥१५॥

माझ्या चरणांचिया नि:शंक ध्याने ।
सहस्रकोटी संकटे पळती भयाने ॥१६॥

खरा भक्त राही, दोन चरणांत माझ्या ।
तिसरे पाऊल माझे तुडवील संकटास तुमच्या ॥१७॥

जेथे भक्ती पूर्ण श्रद्धा व प्रेम ।
तेथे तेथे कर्ता मी त्रिविक्रम ॥ १८ ॥

अभंगलेखक - डॉ. अनिरुद्ध धैर्यधर जोशी

॥ हरि: ॐ ॥ ॥ श्रीराम ॥ ॥ अंबज्ञ ॥
॥ नाथसंविध् ॥